आदर्श आचारसंहिता
ग्रामपंचायत निवडणुका
अतिरिक्त आदेश...

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.९/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०६ सप्टेंबर, २०१७.

**प्रस्तावना :**

संविधानातील तरतुदीनुसार सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होणे आवश्यक असल्याने लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये घेण्यात येणारी सर्व काळजी व दक्षता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येसुध्दा घेणे क्रमप्राप्त आहे. ही बाब लक्षात घेता लोकसभा व विधानसभा निवडणुकांची आदर्श आचारसंहिता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये वापरण्यात येते. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक- रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६, दिनांक- १४/१०/२०१६ अन्वये सविस्तर आदेश निर्गमित केले आहेत.

२. इतर निवडणुकांपेक्षा (लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या) ग्रामपंचायत निवडणुकीचे वैशिष्टय खालीलप्रमाणे आहे :-

(i) ग्रामपंचायती जिल्हयांमध्ये विखुरलेल्या असतात.

(ii) निवडणूक निर्णय अधिकारी बहुतांशी वर्ग-३ चे अधिकारी (वर्ग-१ चे नव्हे) असतात. (उदा. ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, अव्वल कारकून)

(iii) **प्रत्येक जिल्हयामध्ये** निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची संख्या इतर निवडणुकांपेक्षा अत्यंत मोठ्या प्रमाणात असते. (२०१५ च्या निवडणुकीच्या वेळी एका जिल्हयामध्ये ३५० ते ४०० पेक्षा जास्त निवडणूक निर्णय अधिकारी होते.)

(iv) गावाचे क्षेत्र व लोकसंख्या कमी असल्याने बहुतांशी सर्व उमेदवार सर्व मतदारांशी प्रत्यक्षरित्या संपर्क साधू शकतात. याकरिता मोठया प्रमाणावर गाड्या, प्रचार साहित्य व प्रचारकांची गरज भासत नाही.

(v) ग्राम पातळीवर बहुतांशी अधिकारी उदा. तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, इत्यादी निवडणूक व्यवस्थेमध्ये मतदान केंद्राध्यक्ष व इतरांची मदत करीत असल्याने आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते किंवा कसे, यावर बारीक लक्ष ठेवणे बऱ्याचदा अडचणीचे होते.

(vi) सर्व उमेदवार व मतदार यांची एकमेकांशी ओळख असल्याने ही लढत अत्यंत चुरशीची असते व अनेकदा उमेदवार कमी मतांनी जिंकतो किंवा हार पत्करतो, इत्यादी.

३. ग्रामपंचायत निवडणुकीची वरील व इतर वैशिष्टये लक्षात घेता जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आदेशित करण्यात येत आहे :-

## आदेश

४. सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या वेळेपासून, निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.

५. निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणामध्ये होणे आवश्यक असल्याने, राज्य निवडणूक आयोगाने दि.१४/१०/२०१६ रोजी आदर्श आचारसहिता विषयक निर्गमित केलेल्या आदेशातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६. आचार संहिता खालील ग्रामीण क्षेत्रामध्ये लागू राहील:

अ) ज्या जिल्ह्यामध्ये ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये आचारसंहिता लागू राहील.

ब) ज्या तालुक्यात ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्या संपूर्ण तालुक्यात आचारसंहिता लागू राहील.

क) निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींच्या सीमेलगतच्या गावांमध्येसुध्दा आचारसंहिता लागू राहील.

७. आदर्श आचारसंहिता जरी संपूर्ण जिल्हा/तालुका/लगतच्या गावामध्ये लागू असली, तरी ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये निवडणुका नसतील, त्या ठिकाणी विकासाच्या विविध कामांवर कसलाही निर्बंध राहणार नाही. मात्र या क्षेत्रात अशी कोणतीही कृती कोणालाही करता येणार नाही, ज्यामुळे निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या मतदारांवर विपरित प्रभाव पडेल.

८. निवडणूक निर्णय अधिकारी यांचा कार्यालय परिसर (प्रामुख्याने तहसिल कार्यालय) व त्यांच्या संरक्षक भिंतीपासून १०० मीटरच्या परिसरात निवडणुका जाहीर झाल्यापासून मतमोजणीपर्यंत जमाव बंदी लागू करण्यात यावी.

९. नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी आलेल्या उमेदवारासोबत ३ किंवा अधिक व्यक्ती असू नयेत.

१०. ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये प्रत्येक प्रभागासाठी उमेदवाराला एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल. यासाठी आवश्यक तो विद्युत पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत महावितरण विभागाकडून उमेदवाराने रितसर परवानगी प्राप्त करून घ्यावी.

११. एका उमेदवारास प्रचारासाठी एक चार चाकी किंवा दोन दुचाकी वाहनाची परवानगी देण्यात यावी व एका उमेदवाराने प्रचारासाठी परवानगी घेतलेले वाहन दुसऱ्या उमेदवारास वापरता येणार नाही.

१२. तालुका स्तरीय आचारसंहिता पथकाने वाहनासाठी परवानगी देताना त्या वाहनाची नोंदणी प्रमाणपत्र, कर भरलेले पुस्तक तपासून मग परवानगी द्यावी.

१३. ग्रामपंचायत निवडणूक काळामध्ये ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात असणाऱ्या वाड्या, पाडे, वस्त्या या ठिकाणी मद्य व मटणाच्या पार्ट्या चालतात. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने या वाड्या, पाडे व वस्त्यांवर स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने गस्त घालावी व मद्य उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल, काळा गूळ, नवसागर, इत्यादी पदार्थांची साठवण करणाऱ्या व्यापाऱ्यांवर नजर ठेवावी. विशेषत: किनारापट्टीच्या भागातील खारफुटीच्या जंगल भागामध्ये गस्त वाढवावी.

१४. ग्रामपंचायतींची मोठी संख्या व त्यांची वैशिष्टये लक्षात घेता आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. आवश्यकतेप्रमाणे जिल्हा, उप विभाग, तालुका, इत्यादी स्तरावर पथके तयार करावीत व त्यामध्ये योग्य असे अधिकारी नेमण्यात यावेत. गावामध्ये असलेले इतर शासकीय अधिकारी (ज्यांची निवडणुकीच्या थेट कामामध्ये नियुक्ती करण्यात आली नसेल) यांची मदत घेता येईल. जिल्हाधिकारी यांनी खालील बाबींचासुध्दा विचार करावा.

(अ) स्थानिक नागरिकांची बैठक आयोजित करून त्यांना आदर्श आचारसंहितेतील सूचनांबाबत अवगत करून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत आवाहन करावे.

(ब) प्राप्त झालेल्या तक्रारींचा तपशील व्यवस्थित ठेवावा व वस्तुनिष्ठपणे आढावा घेण्याची व्यवस्था करावी.

(क) संवेदनशील भागात व्हिडिओ कॅमेरा वापरण्याबाबत परिस्थितीनुरूप निर्णय घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत अचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात यावी. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याची बाब राज्य निवडणूक आयोगास आढळून आल्यास, त्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची असेल.

१५. तहसील क्षेत्रामधील सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणीसाठी तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांना पर्यवेक्षणाची जबाबदारी देण्यात यावी.

१६. वरील पथकांकडून करण्यात येणाऱ्या कामकाजाचा जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा व प्राप्त झालेल्या आचारसंहिता भंगाच्या प्रकरणांवर तातडीने निर्णय घ्यावेत, अन्यथा राज्य निवडणूक आयोगाकडून याबाबत गंभीर दखल घेण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : १. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव ,गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य
७. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.
८. जिल्हाधिकारी (सर्व)
९. पोलीस महानिरीक्षक (सर्व), महाराष्ट्र राज्य.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व)
१२. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने
१३. निवड नस्ती (२ प्रती).